NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २३.१०.२०२६ शुक्रवार

(कामगिरी)

नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २२.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १३ ईसमावर कारवाई करून एकुण २०,१४४/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०६ केसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण ४,८३३/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २२.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २३.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ ईसमावर** कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २६ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४० केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १०१ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २५५ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ५३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ९२ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये २५ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १११ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०७ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १७ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १० केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१२६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १८ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०४५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ६,४३,२००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे खापरखेडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २२.१०.२०२६ चे १८.३० वा. चे सुमारास, फिर्यादी सत्तार इसराईल छवारे वय ५२ वर्ष रा. वार्ड क्र. २, खापरखेडा ता. सावनेर जि. नागपुर हे त्यांची पत्नी नामे श्रीमती शबनम सत्तार छवारे वय ४० वर्ष यांचेसह मोटार सायकल क्र. एम.एच ४ टी ७५९४ ने घरी जात असता, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत दहेगाव–कामठी रोडवर चेमरी गेटचे बाजुला साई पान ठेल्यासमोर उभी असलेली कार क्र. एम.एच ४० सी.ओ ८४१३ चा चालक आरोपी हा कारमध्ये बसला असता, त्याने मागेपुढे न पाहता अचानक कारचा दरवाजा उघडला. त्यामुळे फिर्यादीची मोटार सायकल कारचे दरवाज्याला धडकली. ज्यामुळे फिर्यादी व त्यांची पत्नी गाडीसह रोडवर

खाली पडले. त्याचवेळी मागुन येत असलेल्या ट्रकचे पुढील चाकाखाली फिर्यादीची पत्नी आल्याने गंभीर जखमी झाली. फिर्यादी व लोकांनी गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मॅक्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे पत्नीस तपसुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. मारोती जंगीलवाड ९०२१११८५९६ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१),२८५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. कार चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे पारडी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.१०.२०२६ चे ०१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी येथील बिटमार्शल हे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना नियंत्रण कक्ष येथुन माहिती प्राप्त झाली की, नागपुर–भंडारा रोडवरील सुरुची कंपनीजवळ एक इसम अपघात अवस्थेत पडुन आहे. अशा माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे एक अनोळखी इसम वय अंदाजे ४० वर्षे, ज्यांनी अंगात ग्रे रंगाचा हॉफ टि–शर्ट ज्यावर पाठीमागे फेविकॉल असे लिहलेले व काळ्या रंगाची फुलपॅन्ट तसेच, पायात काळी पावसाळी चप्पल घातलेली असुन, ते मृत अवस्थेत दिसुन आले. अधिक पाहणी करून विचारपुस केली असता, कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन अनोळखी ईसमास धडक मारून व डोक्यावरुन ट्रकचे चाक गेल्याने, त्यांचे जागीच मरणास कारणीभुत झाल्याचे समजले. मृतदेह पुढील कार्यवाहीस्तव मेयो हॉस्पिटल येथे पाठविण्यात आला आहे.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोअं. गणेश श्रीरामे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. निखिल भराटे ९६८९५६४७९४ यांनी अज्ञात ट्रक चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१)भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे बेलतरोडी :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १७.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १९.१०.२०२६ चे १९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, प्लॉट क्र. १३४, संताजी सोसायटी, मेहेरे ले–आऊट, मनिषनगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अमित दिलीप मिश्रा, वय ४२ वर्षे हे आपले वैयक्तिक कामाने मुंबई येथे तसेच, त्यांची पत्नी, मुले व घरकाम करणारा कुणाल दांडे हे त्यांचे राहते घराला कुलुप लावुन मुळ गावी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मागील बाजुस असलेल्या बाथरुमचे खिडकीची ग्रील काढुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी कपाटातील रोख ४,८०,०००/–रू., सीसीटिव्ही डिव्हीआर तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ९,१२,१५०/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. नारायण घोडके ९२६०६०८०१० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.